**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्र विधानसभेतून समाजवादी पार्टीचे अबु असीम आझमी यांचं निलंबन / छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी अवमानकारक वक्तव्यांच्या मुद्द्यावरुन दोन्ही सभागृहात गदारोळ

- महाराष्ट्रात सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावं लागणारे ५०० रुपयांच मुद्रांक शुल्क माफ करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- अर्थसंकल्पाच्या परिप्रेक्ष्यात रोजगारविषयक बाबींविषयी आयोजित वेबिनारमधे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा सहभाग

- देशात फेब्रुवारी महिन्यापर्यंत १६ कोटी ७० लाख टनांपेक्षा जास्त कोळसा उत्पादन

**आणि**

- आयसीसीच्या चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेतला दुसरा उपांत्य सामना आज दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यात रंगणार

**<><><><><>**

महाराष्ट्रात समाजवादी पार्टीचे आमदार अबु असीम आझमी यांना चालू अधिवेशन संपेपर्यंत सभागृहातून निलंबित करण्यात आलं आहे. एका जाहीर सभेत मुघल शासक औरंगजेबाचं उदात्तीकरण केल्याबद्दल आझमी यांना निलंबित करण्यात यावं असा प्रस्ताव संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मांडला. यावर भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी हरकत घेत आझमी यांचं सदस्यत्व विधानसभेच्या पूर्ण कालावधीसाठी रद्द करावं अशी मागणी केली. मात्र सदस्यत्व कायमचं रद्द करणं नियमात बसत नसून यासाठी आमदारांची समिती स्थापन केली

जाईल असं आश्वासन चंद्रकांत पाटील यांनी दिलं. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मुनगंटीवार यांच्या मागणीला पाठिंबा दिला, तसंच छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान करणाऱ्या सर्वांवर अशीच कारवाई करणार का असा प्रश्न सरकारला विचारला. आझमी यांच्या वक्तव्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा अवमान झाला असल्याचा आरोप करत सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी घोषणा दिल्या. यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाचा जयघोष सुरू केला. यावर विरोधकांनी आक्रमक होत घोषणाबाजी केली.

राहुल सोलापूरकर आणि प्रशांत कोरटकर यांच्यावर कारवाई करण्याची मागणी विरोधकांनी केली. सभागृहात गोंधळाचं वातावरण निर्माण झालं. मात्र कितीही गदारोळ झाला तरी सभागृहाचं कामकाज तहकूब करणार नाही असं विधानसभा अध्यक्षांनी स्पष्ट केलं. त्यामुळे गोंधळातच लक्षवेधी सूचना मांडण्यात आल्या.

अबू आझमी यांचं सदस्यत्व अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत रद्द करण्याचा प्रस्ताव सभागृहात मंजूर झाला.

विधिमंडळ अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी कामकाज सुरू होण्यापूर्वी विरोधी पक्षांनी सभागृहाच्या पायऱ्यांवर निदर्शनं केली. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर, अबु आझमी यांच्याविरूद्ध आमदारांनी जोरदार घोषणाबाजी केली. शिवरायांचा अपमान करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी यावेळी विरोधी पक्षांनी केली.

**<><><><><>**

विधान परिषदेचे कामकाज सुरू झाल्यावर आज काँग्रेस आमदार भाई जगताप यांनी अबू आझमी यांनी केलेल्या वक्तव्याचा मुद्दा उपस्थित केला. सत्ताधारी पक्षाचे सदस्य आणि मंत्री हौद्यात येऊन गोंधळ घालत होते, ही चुकीची

पद्धत असल्याचं ते म्हणाले. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आझमी, प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर यांच्या विरोधात कारवाईची मागणी केली. त्यानंतर दोन्ही बाजूचे सदस्य सभापती यांच्या समोरच्या जागेत घोषणाबाजी करू लागले. त्यामुळे सभापती राम शिंदे यांनी कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब केलं.

<><><><><>

महाराष्ट्राचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू शिवाजी कोकाटे यांना ठोठावलेल्या दोन वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेला नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने आज स्थगिती दिली. यामुळे माणिकराव कोकाटे यांच्या आमदारकीवरची टांगती तलवार दूर झाली आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावं लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय आज राज्य सरकारनं घेतल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. या निर्णयाची अंमलबजावणी तातडीनं करण्याचे निर्देश महसूलमंत्री बावनकुळे यांनी दिले आहेत.

राज्य सरकारच्या या निर्णयामुळे जात पडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर सर्टिफिकेट, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्रासह शासकीय कार्यालयात दाखल करायच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावं लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क यापुढे भरावं लागणार नाही. त्याऐवजी केवळ स्व-साक्षांकित अर्ज लिहून तहसील कार्यालयातून प्रमाणपत्र दिली जातील. या निर्णयाचा फायदा दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांबरोबरच कोट्यवधी नागरिकांनाही होणार आहे.

<><><><><>

यंदाच्या अर्थसंकल्पाच्या परिप्रेक्ष्यात रोजगारविषयक बाबींविषयी आयोजित वेबिनारला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी संबोधित करत आहेत. रोजगार आणि नवोन्मेष

क्षेत्रात गुंतवणूक हा चर्चासत्राचा विषय आहे. रोजगार निर्मितीला सरकारचं प्राधान्य असून, प्रधानमंत्र्यांच्या दूरदृष्टीमुळे सरकारनं रोजगार वाढीला चालना देण्यासाठी आणि रोजगारासाठी अधिक संधी निर्माण करण्याची अनेक पावलं उचलली आहेत. अशा चर्चासत्रांमधून सरकार, खासगी उद्योग, शैक्षणिक संस्था आणि नागरिक यांच्यामधील सहकार्य वृद्धिंगत करून, जागृती घडवण्याचा उद्देश आहे.

**<><><><><>**

पंचायती राज राज्यमंत्री एस पी सिंह बघेल आणि आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी आज नवी दिल्लीत झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनात 'महिला अनुकूल ग्रामपंचायत' या उपक्रमाचं उदघाटन केलं. हा उपक्रम पंचायती राज मंत्रालयाच्या आंतरराष्ट्रीय महिला दिन २०२५चा एक भाग आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान एक महिलास्नेही ग्रामपंचायत स्थापन करणं हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमात विविध मंत्रालयं, विभाग आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

**<><><><><>**

नवोन्मेष, समावेशकता, शाश्वतता आणि विश्वास हाच तंत्रज्ञानाधिष्ठित प्रशासनाचा गाभा असल्याचं प्रतिपादन दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी केलं आहे. स्पेनमध्ये बार्सिलोना इथं झालेल्या मोबाईल वर्ल्ड काँग्रेसमध्ये ते बोलत होते. स्पेक्ट्रम व्यवस्थापन, बाजारातलं स्थैर्य सुनिश्चित करणं, देशातंर्गत विविध प्रक्रिया सुलभ करण्यासाठी दूरसंचार नियमन सुरू करणं आणि सायबर सुरक्षेसाठी उपाययोजना अशा विविध पद्धतीनं भारत तंत्रज्ञानाधिष्ठित प्रशासनाच्या दिशेने पुढे जात असल्याचं ते म्हणाले. या कार्यक्रमात शिंदे यांनी इंडिया मोबाइल काँग्रेस दालन आणि भारत पॅव्हेलियनचं अनावरण केलं. या दालनात ३८ भारतीय दूरसंचार उपकरणांचं प्रदर्शन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

देशातल्या खाण क्षेत्रात चालू आर्थिक वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यापर्यंत १६ कोटी ७० लाख टनांपेक्षा जास्त कोळसा उत्पादन झाल्याची माहिती कोळसा मंत्रालयानं दिली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यात हाच आकडा १२ कोटी ६० लाख टन इतका होता. वीज, पोलाद आणि सिमेंटसारख्या क्षेत्रांना अखंड कोळसा पुरवठा होत आहे. हा पुरवठा अखंड राहावा आणि या क्षेत्राला चालना मिळावी यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचंही मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

श्रीशैलम इथल्या एसएलबीसी प्रकल्पाच्या बोगद्यात अडकलेल्या ८ जणांना बाहेर काढण्याचं कार्य वेगानं सुरु आहे. २२ फेब्रुवारीला हा अपघात झाला होता. बोगद्यातल्या कन्व्हेअर बेल्टची दुरुस्ती करण्यात आली असून ढिगारा बाहेर काढण्याचं काम सुरु आहे. बोगद्यातल्या घाण,पाणी आणि कठीण परिस्थितीचं बचाव कर्मचाऱ्यांसमोर आव्हान आहे. दिल्लीतल्या नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजीचे प्रतिनिधीही बचावकार्यात सहभागी झाले आहेत. त्यासोबतचं एनडीआरएफ, भारतीय लष्कर, नौदल आणि इतर यंत्रणांचे तज्ज्ञही प्रयत्न करत आहेत.

**<><><><><>**

आयसीसीच्या चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेतला दुसरा उपांत्य सामना आज दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यात रंगणार आहे. काल दुबई इथं झालेल्या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा ४ गडी राखून पराभव करत अंतिम फेरी गाठली आहे. भारताचा अंतिम फेरीतील सामना आज होणाऱ्या दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यातील विजेत्या संघाशी येत्या ९ मार्च रोजी दुबईत होणार आहे.

**<><><><><>**

चॅम्पियन्स करंडक स्पर्धेत भारतानं ऑस्ट्रेलियाला पराभूत केल्यानंतर क्रिकेट संघातला प्रमुख फलंदाज स्टीव्ह स्मिथ यानं आज एकदिवसीय क्रिकेट प्रकारातून निवृत्ती जाहीर केली. कसोटी आणि टी-२० क्रिकेट प्रकारात आपण खेळणार असल्याचं स्मिथ यानं सांगितलं.

क्रिकेटमधली वाटचालीत अनेक समाधान आणि आनंद देणाऱ्या आठवणी आहेत. दोन विश्वचषक विजेत्या ऑस्ट्रेलिया संघाचा भाग होणं अभिमानास्पद क्षण असल्याचं स्मिथनं म्हटलं आहे. स्मिथनं १७० एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाचं प्रतिनिधित्व करत  ५ हजार ८०० धावा केल्या आहेत. यामध्ये १२ शतकं आणि ३५ अर्धशतकांचा समावेश आहे. एकदिवसीय प्रकारात स्मिथच्या नावावर २८ बळींची नोंद आहे.

**<><><><><>**

देशाच्या उत्तरेकडच्या डोंगराळ भागात अलिकडेच झालेल्या हिमवृष्टीचा तसंच पश्चिमी वाऱ्यांचा परिणाम दिसत आहे. राजस्थान, दिल्ली, हरयाणा आणि उत्तरप्रदेशचा पश्चिमेकडचा भाग थंडीच्या अमलाखाली आहे. थंड वाऱ्यांच्या प्रभावामुळे पुढचे दोन दिवस या भागात तापमान कमी राहील असा हवामानविभागाचा अंदाज आहे. अरुणाचल प्रदेश, सिक्किम आणि पश्चिम बंगालचा हिमालयातला भाग इथं पावसाची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात तसंच गुजरात आणि महाराष्ट्राच्या उत्तर किनारपट्टीवर मच्छिमारांनी समुद्रात जाऊ नये असा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**//<><><><><>//**